RNI No. MAHBIL/2009/35526

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-क

वर्ष ७, अंक १०] गुरुवार ते बुधवार, एप्रिल १५-२१, २०२१/चैत्र २५-वैशाख १, शके १९४३ [पृष्ठे २

[ किंमत : रुपये ६.०० ]

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय

रॉयल इन्शुरन्स इमारत, ५वा मजला, ज. टा. मार्ग

चर्चगेट, मुंबई ४०० ०२०, दिनांक ५ एप्रिल २०२१.

**वाचा**.—(१) दि केरोसीन (रेस्ट्रीक्शन ऑन युज अॅण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्राईस) ऑर्डर, १९९३.

(२) शासन निर्णय क्रमांक रॉकेल-२०१४/प्र.क्र. १६१/ना.पु. २७, दिनांक १ एप्रिल २०१७.

(३) शासन पत्र क्रमांक रॉकेल-२०१८/प्र.क्र. १/ना.पु. २७, दिनांक १४ मे २०१८.

(४) क्रमांक निशि/केरो/२०२१/५१/आठ/जा. २१, दिनांक १ मार्च २०२१.

(५) राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांचा दिनांक १ एप्रिल २०२१ रोजी प्राप्त ई-मेल संदेश.

### अधिसूचना

क्रमांक निशि/केरो/२०२१/८०/आठ/जा. ३१.– शासनाने संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांच्याकडून सुधारित डेपो दर प्राप्त करून घेऊन त्याआधारे केरोसीनचे दर सुधारित करण्याची कार्यवाही करावी, असे आदेशित केले आहे ;

ज्याअर्थी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील एक्स डेपो दरामध्ये दिनांक १ एप्रिल २०२१ पासून सुधारणा केलेली असल्याचे राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई यांनी या कार्यालयास संदर्भ क्र. ५ च्या ई-मेल संदेशाद्वारे कळविले आहे ;

संदर्भ क्रमांक २ मधील नमूद शासन निर्णयातील तरतुदींनुसार केरोसीन वाहतुकीपोटी येणाऱ्या केवळ डिझेलवरील खर्चात झालेली वाढ मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे केवळ डिझेल दरवाढीमुळे वाहतूक खर्चात वाढ देताना डिझेल दरवाढीचा खर्च देण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय दिनांक २६ सप्टेंबर २००१ अन्वये विहित केलेल्या सुत्रानुसार (Escalation Formula) केरोसीन वाहतुकीसाठी दरवाढ खर्च देण्याचे शासनाने ठरविले आहे. केरोसीनची वाहतूक करण्याकरिता डिझेल दरामध्ये वाढ/घट झाल्यानुसार द्यावयाच्या वाहतूक दरात विहित सुत्रानुसार (Escalation Formula) वाढ करण्याबाबतचे अधिकार नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांना या शासननिर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत. तसेच नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी दरवर्षी दिनांक १ एप्रिल रोजी असलेले डिझेलचे दर विचारात घेऊन त्याच दिवशी दिनांक २६ सप्टेंबर २००१ चे विहित सूत्र (Escalation Formula) वापरून डिझेलच्या दरातील वाढीवर आधारित केरोसीन वाहतूक दर निश्चित करून त्याबाबत तात्काळ आदेश निर्गमित करावेत असे नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने सुधारित एक्स-डेपो दराचा तक्ता सोबत पाठवून सदर सुधारित एक्स-डेपो दराच्या अनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या केरोसीनचा सुधारित कमिशनसह घाऊक व किरकोळ विक्री दर निश्चित करून त्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, वाचा क्र. १ मध्ये नमूद आदेशान्वये मुंबई, (मुंबई शहर व मुंबई उपनगर) केरोसीनच्या घरगुती वापराचे घाऊक व किरकोळ विक्रीचे दर दिनांक १ एप्रिल २०२१ पासून पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ अंमलात आणणेकरिता पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे :—

| अ. क्र. | बाब | सध्याचा दर (रुपये प्रति कि. लि.) | सुधारित दर (रुपये प्रति कि. लि.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ए | एक्स डेपो दर (रुपये प्रति कि. लि.) | ३१०७३.०० | ३२३८६.०० |
| बी | वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) @ ५% | १५५३.६५ | १६१९.३० |
| सी | घाऊक विक्रेत्यासाठी एकूण खरेदी किंमत (ए+बी) | ३२६२६.६५ | ३४००५.३० |
| डी | (*i*) घाऊक विक्रेत्याचे कमिशन | १३४१.८८ | १३४१.८८ |
| | (*ii*) तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी असाधारण भत्ता. | ९९.०० | ९९.०० |
| | (*iii*) (A) वाहतूक खर्च | २८०.७९ | २८०.७९ |
| | (B) डिझेल व्यतिरिक्त अनुषंगिक बाबींचा खर्च | ७०.२० | ७०.२० |
| | (C) डिझेलवरील खर्चात झालेली वाढ | ४७.५६ | ९९.३४ |
| | एकूण वाहतूक खर्च (A+B+C) | ३९८.५५ | ४५०.३३ |
| | (*iv*) पथकर (Toll Tax) | ७०.०० | ७०.०० |
| | (*v*) घाऊक वितरकांना पूर्णांकाचा लाभ | ९.२४ | ६.३६ |
| | (*vi*) एकूण किंमत वाढ : [डी (*i*) + डी (*ii*) + डी (*iii*) + डी (*iv*) + डी (*v*)] | १९१८.६७ | १९६७.५७ |
| इ | एकूण किंमत वाढीवर, वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) @ ५% [डी (*vi*) च्या ५%]. | ९५.९३ | ९८.३८ |
| एफ | एकूण [सी+डी (*vi*) + इ] घाऊक विक्रीचा दर | ३४६४१.२५ | ३६०७१.२५ |
| एफ-१ | किरकोळ विक्रेत्यासाठी खरेदी किंमत | ३४६४१.२५** (किंमत रुपये ३२९९१.६७+ वस्तू व सेवा कर रुपये १६४९.५८) | ३६०७१.२५** (किंमत रुपये ३४३५३.५७+ वस्तू व सेवा कर रुपये १७१७.६८) |
| जी | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह) | ६७५.०० | ६७५.०० |
| एच | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह) वर टक्के वस्तू व सेवा कर (जी.एस.टी.) (जी च्या ५ टक्के) | ३३.७५ | ३३.७५ |
| आय | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति किलो लीटर) | ३५३५०.००** (किंमत रुपये ३३६६६.६७ वस्तू व सेवा कर रुपये १६८३.३३) | ३६७८०.००** (किंमत रुपये ३५०२८.५७ वस्तू व सेवा कर रुपये १७५१.४३) |
| जे | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति लीटर) | ३५.३५ | ३६.७८ |

शासन परिपत्रक क्रमांक अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक केईआर. १३७६/३७६९/सतरा, दिनांक १७ डिसेंबर १९७६ नुसार पूर्णांकाचा लाभ एकाच पातळीवर (घाऊक वितरक) घाऊक दरामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

**कैलास पगारे** (भा.प्र.से.),
नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.